## संपादकीय..
संपादक:- राकेश शंकर गोरे

# घर घर मोदी

२१ व्या शतकात आपल्या सर्वांच्या आयुष्यावर तंत्रज्ञानाचा प्रचंड पगडा असताना आणि तंत्रज्ञानामुळेच जीवनाला वेग आला असताना तंत्रज्ञानावर सरकारचे नियंत्रण असावे का, हा प्रश्न आता तात्त्विक स्वरूपाचा राहिलेला नाही. जगभरात लोकशाही स्वीकारलेल्या अनेक देशांनी ही तात्त्विक चर्चा मागे सारून तंत्रज्ञानाधिष्ठित व्यक्तिस्वातंत्र्य मूल्याला घटनात्मक अधिष्ठान देऊन व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार हा अधिक व्यापक केला आहे. फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, ट्विटर ही समाजमाध्यमे व इंटरनेट ही आता सार्वभौम अभिव्यक्तीची माध्यमे झाली आहेत आणि जगाचा हा प्रवाह वा तंत्रज्ञानाची ही लाट रोखणे आता व्यवस्थेच्या आवाक्याबाहेरचे आहे तरीही काही विघ्नसंतोषी मंडळी लोकशाहीच्या या नव्या माध्यमाला नख लावत स्वत:ची कबर स्वत:च खोदत असतात.

गेल्या आठवड्यात राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव देशातील १० तपास यंत्रणांना खासगी संगणकातील माहितीवर देखरेख ठेवणे, ती तपासणे व हस्तगत करण्याचा अधिकार दिला आहे. त्याचबरोबर सोशल मीडियात व्यक्तीची माहिती, तिचे संभाषण, सरकारविषयीची मते, माहिती, प्रचार यावर सरकारचे नियंत्रण असून सरकार कुणाचेही खासगी संभाषण वाचू शकते असा हा निर्णय आहे. सत्तेत आल्यानंतर कुणी काय खावे यावर मोदी सरकारने बंधने आणण्याचा प्रयत्न केला होता. नोटबंदी करून खिशातल्या पैशावरही डल्ला मारला होता. आता कुणी कुणाशी कसे बोलावे, कसा संवाद साधावा यावरही सरकारची नजर राहिल्याने मोदी-शहा-जेटलींच्या कानी दोन व्यक्तींमधील खासगी संभाषण जाऊ शकते. दोन पत्रकार मोदींच्या निर्णयाची चर्चा करत असतील वा त्यावर टीकात्मक स्वरूपाची बातमी करत असतील तर ते या त्रिकुटाच्या कानी सहज पोहोचेल. हे सरळ सरळ व्यक्तिस्वातंत्र्याचे उल्लंघन तर आहेच, पण राष्ट्रीय सुरक्षेच्या कायद्याची ढाल करत आपल्या विरोधकांना भीतीत ठेवण्याचा, त्यांच्या हालचालीवर-प्रचारावर नजर ठेवण्याचा सरकारचा हा प्रयत्न आहे यात शंका नाही. एकीकडे तिन्ही त्रिकाळ आणीबाणीत व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात आणल्याचा आरोप करत काँग्रेसवर टीका करणाऱ्या जेटली यांनी २००९ मध्ये यूपीए-२ सरकारने असा कायदा अमलात आणला होता असे कारण देत आपल्या या निर्णयाचे समर्थन केले आहे.



हे एकीकडे हास्यास्पद आहे, पण हे महाशय सर्वोच्च न्यायालयात वकील आहेत याचा त्यांना विसर पडला की काय असे वाटून राहते. अरुण जेटली पंतप्रधान मोदींचे उजवे हात आहेत व मोदी अडचणीत येतील अशा निर्णयांची घोषणा त्यांच्याकडून होण्याची शक्यता नाही. ही घोषणा आताच का करण्यात आली यामागे २०१९ च्या लोकसभा निवडणुका हे एक प्रमुख कारण आहे. तीन राज्यांत मोदी-शहा-आदित्यनाथ यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागल्याने भाजपच्या राजकारणाला एकूणच ग्रहण लागले आहे. त्यांना जनतेमधील सरकारविरोधातला क्षोभ, विरोधकांची आक्रमक रणनीती दिसू लागली आहे. हे वातावरण अजून सहा महिने राहू नये म्हणून असले कायदे पुढे केले जात आहेत. जेटलींनी २००९ च्या ज्या कायद्याचे समर्थन केले होते त्याला भाजपनेच काय, एकाही विरोधी पक्षाने विरोध केला नव्हता. मात्र त्या वेळी या कायद्याच्या विरोधात माध्यमांनी, विचारवंतांनी धोके सांगून ठेवले होते. नऊ वर्षांपूर्वी आजच्यासारखा सोशल मीडिया बोकाळला नव्हता. आता परिस्थिती तशी नाही. खुद्द भाजपने २०१४ ची लोकसभा निवडणूक सोशल मीडियाचा कुशल वापर करून जिंकली होती. आता त्यांच्याविरोधात होणारा प्रचार त्यांना अस्वस्थ करत असेल तर त्यांनी लोकांच्या भावना समजून घेणारे राजकारण केले पाहिजे. दरवेळी काँग्रेसने चुका केल्या ते दाखवून देत त्यांच्याच चुका जनतेच्या माथी मारण्याचे उद्योग सरकार करत असेल तर लोकक्षोभाचा दणका त्यांना २०१९ मध्ये बसल्याशिवाय राहणार नाही.

सध्या संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे आणि सर्व विरोधी पक्षांनी सरकारच्या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरण्याचा व सरकारला संसदेत जाब विचारण्याचा निर्णय घेतला आहे. काही मानवाधिकार संस्था सरकारच्या या निर्णयाला न्यायालयात आव्हानही देतील, कदाचित प्रचंड विरोधामुळे सरकार माघारही घेईल. पण यानिमित्ताने एकाधिकारशाहीचा, हुकूमशाही पद्धतीने सत्ता चालवण्याचा मुद्दा चर्चेस येण्याची गरज आहे. कोणत्याही सरकारला बहुमत मिळाले म्हणजे त्यांच्याकडे अनिर्बंध सत्ता आली असे आपल्या राज्यघटनेला अभिप्रेत नाही. सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी राज्यघटना डोळ्यासमोर ठेवून सर्वोच्च न्यायालयाने अशा कायद्यांची कठोर चिकित्सा करावी अशी परिस्थिती आली आहे. आजपर्यंत देशातील न्यायालयांनी जेव्हा केव्हा व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात आले तेव्हा सरकारला वठणीवर आणले होते. आताही ती वेळ आली आहे. 'घर घर मोदी' हे प्रचारात ठीक होते, प्रत्यक्षात तो लोकशाहीला धोका आहे.

# मातृत्वाच्या बाजाराला चाप

मातृत्वाचा बाजार मांडणाऱ्या 'व्यावसायिक सरोगसी'ला चाप लावणारे विधेयक अखेर लोकसभेने मंजूर केले आहे. त्यामुळे मातृत्वाची अतूट इच्छा असलेल्या जोडप्यांसाठी आपले गर्भाशय भाड्याने देण्याच्या भारत या जगभरातील सर्वांत मोठ्या बाजारपेठेवर निर्बंध लादण्याच्या दिशेने काही कठोर पावले टाकली गेली, हे चांगले झाले. गेली अनेक वर्षे हा बाजार मोठ्या प्रमाणावर सुरू होता आणि त्याचा लाभ प्रामुख्याने



परदेशी जोडपी घेत होती. अभिनेता शाहरूख खान याने या मार्गाचा वापर करून अपत्य मिळवल्यानंतर हा विषय खऱ्या अर्थाने अजेंड्यावर आला होता. सरोगसीच्या या बाजारामुळे प्रामुख्याने महिलांचे शोषण; भले त्यांना त्यापायी चांगले पैसे मिळत असले तरी होत होते आणि त्यामुळेच नैतिकतेचे अनेक प्रश्नही उभे ठाकले होते. लोकसभेत आवाजी मतदानामुळे हे विधेयक मंजूर झाले असले, तरी काँग्रेसने या इतक्या महत्त्वाच्या विषयावरील चर्चेत भाग घेण्याचे का टाळले, हा प्रश्नच आहे. तृणमूल काँग्रेस, बिजू जनता दल तसेच आम आदमी पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या या सदस्यांनी या विधेयकावरील चर्चेत केलेल्या सूचना महत्त्वाच्या होत्या. तृणमूल काँग्रेसचे खासदार काकोली घोष यांनी तर 'अभिनेत्यांकडून होणारा सरोगसीचा वापर थांबवावा,' अशी थेट सूचनाच या वेळी केली.

खरे तर या विधेयकाचा मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळाने दोन वर्षांपूर्वीच मंजूर केला होता आणि त्यामुळे चर्चेचे मोहोळ उठले होते. त्यानंतर संसदेच्या स्थायी समितीने सुचवलेल्या अनेक सूचनांचा विचार करून मांडलेले सुधारित विधेयक आता मंजूर झाले आहे. मात्र दोन वर्षांपूर्वी सरोगसीच्या या बाजारावर पूर्णपणे बंदी घालण्याचा दोन वर्षांपूर्वी केलेला विचार आता सरकारला बासनात बांधून ठेवावा लागला असून काही शर्तींवर आता 'सरोगसी'स परवानगी देण्यात आली आहे. लग्नानंतर पाच वर्षे उलटल्यावरही मूल न झालेल्या दांपत्यांनाच या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. त्यासाठी नात्यातील महिलेलाच पुढे यावे लागणार आहे. याचा स्पष्ट अर्थ पैशाच्या लोभापोटी वा दारिद्र्यामुळे त्यासाठी पुढे येणाऱ्या महिलांना आता या बाजारात उतरता येणार नाही. त्याचबरोबर या मार्गाने अपत्यप्राप्ती करून घेऊ इच्छिणाऱ्या परदेशी दांपत्यांना आता भारतात येऊन या मार्गाचा वापर करता येणार नसल्यामुळे ही 'बाजारपेठ' आता बंदच होणार आहे. 'व्यावसायिक सरोगसी'वर घेतल्या जाणाऱ्या प्रमुख आक्षेपात यामुळे होणारे महिलांचे 'वस्तूकरण' तसेच त्यांची होणारी फसवणूक यास आळा बसणार आहे.

# शब्दकोडे क्रमांक-३९



### उभे शब्द

१. यजमानीण २. पहारेकरी ३. कलंक ४. सुकुमार ५. न थांबता ६. धैर्य ७. दारूचा एक प्रकार ८. उद्याच्या नंतरचा दिवस ११. गर्दीचा विळखा १३. भावाची पत्नी १५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते! १७. धार्मिक पर्यटन १८. महिला, बाई १९. प्रफुल्लित २१. पटपट, वेळ न दवडता २३. मानसिक धक्का (हिंदी) २६. वस्तूचा छोटा तुकडा २८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा २९. वार्ताहर ३०. पाणी ३१. आई-वडील ३३. सूत काढण्याचे एक साधन ३५. आरोळी, ललकारी ३७. जिव्हा ३९. मळलेले ४०. आपला नसलेला ४४. अरण्य ४६. अंजन ४८. चेष्टेखोर ४९. न वापरलेली, नवी ५१. दुलई ५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली ५५. लेखणी ५६. भिऊन पळ काढणारा ५७. भटकणारा ५९. आशीर्वाद ६१. माळ, हार ६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा ६४. तुलनेतील सारखेपणा ६५. अनुत्तीर्ण ६७. चर्चा ६८. लाकडाची उत्कृष्ट जात ६९. रानरेडा ७०. सुंदर तरुणी ७३. दरवाजा ७४. मृत्तिकापात्र ७५. सुविधा ७७. मगज ७८. द्रव्य ७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा.

### आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला ५. असामान्य ८. पान (सं.) ९. हृष्ट १०. 'पुरी'चे दैवत १२. मोठा नगारा १३. नवरदेव १४. व्याख्यान १५. रेशमचा किडा १६. अंदाज, तर्क १८. राबता, जाणे-येणे २०. प्रमाणपत्र २२. मच्छर २४. स्वाभिमानी स्त्री २५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका २७. धमकी, श्वास ३०. व्यवस्थित ३२. अखबार ३३. कासंडी, दुधाची घागर ३४. हाताचा एक अवयव ३६. व्यवस्था ३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम ४०. जहाजांचा मुक्काम ४१. फळातील द्रव ४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड ४३. पंगत ४५. दरोडा ४७. अपशकुन ५०. नकला करणारा ५२. हिशोबाची एक बाजू ५४. यात्रेत नियमित जाणारा ५६. दुधाच्या वड्या ५८. शेजारी शेजारी ६०. झकास ६१. एक मंगलवाद्य ६३. निवासस्थान ६४. समोरसमोरची चकमक ६५. पूर्णपणे ६७. एक सुगंधी वनस्पती ६८. समुद्र ७०. रमणीय ७१. असुर, दानव, देवांचा शत्रू ७२. गाजावाजा ७३. किंमत, पैसा ७४. विशेष ७५. चंद्र ७६. निकट, जवळ ७८. भूकंप ८०. मलई ८१. फरक ८२. घराणे ८३. रंग बदलणारा प्राणी

## थोडक्यात महत्वाचे

### चिल्लरच्या रूपात मिळतोय 'बेस्ट' पगार

**मुंबई (अमोल गुडेकर)-** सुट्ट्या पैशांवरून कंडक्टर आणि प्रवाशांमध्ये नेहमीच खटके उडत असतात. मात्र हेच सुट्टे पैसे पगार स्वरूपात बेस्ट कर्मचाऱ्यांना मिळू लागले आहेत. आर्थिक अडचणीत असलेला बेस्ट उपक्रम कामगारांचा पगार दररोज बस भाड्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या चिल्लरद्वारे भागवित आहे. बेस्ट उपक्रम तुटीत असल्याने कामगारांचा दर महिन्याचा पगार देण्यातही अडचण येत आहे. पैशांची तजवीज झाल्यानंतरच कामगारांना पगार देण्यात येत होता. त्यामुळे कामगारांचा पगार दर महिन्याच्या २० तारखेनंतर होऊ लागला. परिणामी,



कामगारांमध्ये रोष पसरून आंदोलनाचा इशाराही कामगारांनी अनेकवेळा दिला. अखेर प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पगार देण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. हा पगार नाण्यांच्या स्वरूपात मिळत आहे. नोव्हेंबरमध्ये सुमारे ३९ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना पगाराचा भाग म्हणून प्रत्येकी १० रुपयांची ४० नाणी देण्यात आली. अशा प्रकारे पगाराचा हिस्सा म्हणून एक कोटी चार लाख रुपयांचे वाटप नाण्यांच्या स्वरूपात झाले. त्यामुळे प्रत्येक महिन्याला चिल्लर मोजण्याची वेळ बेस्टच्या कामगारांवर आली आहे. बेस्ट उपक्रमात परिवहन सेवेतून जमा होणाऱ्या सुट्ट्या पैशांचा विनियोग वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो. त्यानंतरही मोठ्या प्रमाणात रक्कम शिल्लक राहते. काही बँकांमध्ये चिल्लर स्वीकारली जात नाही. त्यामागेही सुट्टे पैसे मोजणार कोण, ताळमेळ आदी अनेक समस्या असतात.

# सुडोकू क्रमांक-३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | 3 | 4 | 6 | | | | |
| 4 | 7 | | | | 5 | 1 | | 9 |
| 5 | | | | | 3 | | 6 | 8 |
| | | | 2 | | 9 | 7 | | |
| 7 | | | 3 | | 8 | | | 4 |
| | | 2 | 7 | | 6 | | | |
| 1 | 9 | | 5 | | | | | 6 |
| 6 | | 5 | 1 | | | | 8 | 2 |
| | | | | 9 | 4 | 5 | 1 | |




**सुविचार** टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी राहील. प्रकाशक मंडळींना चांगला लेखक हाताशी येईल. शिक्षण क्षेत्रात नाव मोठे करता येइल.

**वृषभ-** आपल्यासाठी एकच महत्त्वाचा आजचा सल्ला म्हणजे हाताखालील लोकांकडून आज बरीच कामे करून घ्यायचे आहेत.

**मिथुन-** एखादी रहस्यमय बातमी हाती येईल. स्नेहसंबंध दृढ होतील. सहज जाता-जाता एखादा आर्थिक व्यवहार संपन्न होईल.

**कर्क-** वडिलोपार्जित इस्टेटीचे वाद असतील तर आज तरी वाढवू नका. नोकरी-व्यवसायातले निर्णय झटपट घ्यावे लागतील.

**सिंह-** ऐनवेळी कोणाची झालेली मदत, अनपेक्षितपणे वाढलेली आवक अडथळे यातून आनंददायी वार्ता समोर येईल.

**कन्या-** आज आपल्या बोलण्यावर आपण बरेच काही कमवू शकाल. नोकरदार असो की व्यावसायिकास चांगली संधी मिळेल.

**तूळ-** आजची एखादी कृतीसुद्धा आपणास मनसोक्त यश देणारी ठरू शकते.

**वृश्चिक-** राजकारणात असलेल्या मंडळींना वेळीच सावधानतेचा इशारा मिळेल. सामाजिक कार्यातूनही एखादी धोक्याची घंटी ऐकू येणे शक्य.

**धनु-** कामाच्या ठिकाणी काम, घरातल्या ठिकाणी घरचे काम आणि देवधर्माच्या वेळेस फक्त देवधर्म असे वागणेच महत्त्वाचे आहे.

**मकर-** वादविवाद होतीलही परंतु यशाचा 'ग्राफ' वाढता राहील. कुठेही स्वत:चा हेका चालू न ठेवता समोरच्याचे शांतपणे ऐका.

**कुंभ-** कामाच्या ठिकाणी खर्चाचा एखादा मोठा आकडा समोर येणे शक्य. वैवाहिक जीवनात एखादी आनंद वार्ता आपणास कळू शकते.

**मीन-** घरगुती बाबतीत आपणास आनंददायी घटना कळेल. थोडे शांतपणे व बरेचसे विचारपूर्वकच पाऊल टाकायचे आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
दक्षिण मुंबई (विद्युत) सा.बां.विभाग, मुंबई

ई-निविदा सूचना

https://mahatenders.gov.in

डीजीआयपीआर/ २०१८-२०१९/५१५८

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

